**मा.पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे दि.१७/१०/२०१३ रोजी झालेल्या चंद्रपूर क्षेत्रातील पर्यावरणीय स्थितीबाबत आढावा बैठकीचे इतिवृत्त.**

मा.पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर क्षेत्रातील पर्यावरणीय स्थितीबाबत व चंद्रपूर कृती आराखड्याची आढावा बैठक दि.१७/१०/२०१३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली. सदर बैठकीस मा.खासदार, विधानसभा सदस्य, मा.प्रधान सचिव (पर्यावरण), मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ, मुंबई, मा. विभागिय आयुक्त, नागपूर, जिल्हाधिकारी, चंद्रपूर सह-संचालक, म. प्र. नि. मंडळ, मुंबई, अशासकीय संस्था व इतर शासकिय अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम सह-संचालक (ह.प्र.नि.), म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, मुंबई यांनी चंद्रपूर क्षेत्रातील पर्यावरणीय सद्यस्थिती व CEPI अंतर्गत म.प्र.नि.मंडळातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. चंद्रपूर क्षेत्राकरीता म. प्र. नि. मंडळातर्फे तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्यामध्ये कारखानदार, इतर शासकिय विभाग तसेच अशासकिय संस्था यांचा समावेश असल्याचे सांगून या सर्वांनी त्यांच्याशी संबंधीत मुद्यांवर कार्यवाही करणे अपेक्षीत होते असे त्यांनी सांगितले. कारखानदारांद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची सद्यस्थिती म. प्र. नि. मंडळाच्या सादरीकरणामध्ये दाखविण्यात आलेली असून चंद्रपूर व वणी क्षेत्रातील पर्यावरणीय सद्यस्थिती बाबतचा अभ्यास करण्याचे काम आय. आय. टी. मुंबई व निरी या संस्थाना देण्यात आलेले असून या कामाच्या सद्यस्थितीबाबत माहिती निरीच्या सादरीकरणामध्ये दाखविण्यात आलेली आहे असे त्यांनी सांगितले. प्रदूषणाचे स्त्रोत माहिती होणे आवश्यक असून स्त्रोत माहिती झाल्यानंतरच त्यावर प्रतिबंधात्मक कार्यवाही केली जाऊ शकते. आय. आय. टी. मुंबई व निरी या संस्थांद्वारे करण्यात आलेल्या पाहणीमध्ये कारखान्याद्वारे होणाऱ्या प्रदूषणासोबतच इतर स्त्रोतसुध्दा प्रदूषणास जबाबदार असल्याचे आढळून आले आहे. या अभ्यासाबाबत मा. लोकप्रतिनीधी व इतर उपस्थितांची मते, सुचना जाणून घेऊन त्याचा समावेश करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

डॉ. राजेश बिनीवाले (शास्त्रज्ञ, निरी) यांनी चंद्रपूर क्षेत्रामधील पर्यावरणीय सद्यस्थितीबाबत आय. आय. टी., मुंबई व निरी या संस्थाद्वारे करण्यात येत असलेल्या पाहणी व अभ्यासाच्या सद्यस्थितीबाबचे सादरीकरण केले. सादरीकरणादरम्यान त्यांनी विषद केले की, अभ्यास अद्याप पुर्ण व्हावयाचा असून जेवढा अभ्यास झाला आहे त्यावर प्राथमिक अहवाल सादर करण्यात येत असून तुलनात्मक अभ्यासावरुन लक्षात येते की, उद्योगामुळे प्रदुषणापेक्षा इतर स्त्रोतांचा हातभार जास्त आहे.

मा.खासदार श्री. हंसराज अहीर यांनी, लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सुचनांवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मिळत नसल्याचे सांगितले. त्यांनी, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे संच अतिशय जुने झालेले असल्यामुळे सदरील सर्व संचामधून जास्त प्रमाणात धुळीकण उत्सर्जित होत असल्याचे सांगितले. सदरील विद्युत केंद्रामधील संच क्र. १ व २ सर्वात जुने असून ते बंद करण्याची तसेच कालांतराने संच क्र. ३ व ४ सुध्दा बंद करण्याची त्यांनी मागणी केली. कोळसा वाहतुकीमुळे सर्वाधिक प्रदूषण होत असून कोळशाचे वहन कन्व्हेअर बेल्टद्वारे किंवा रेल्वेद्वारे करण्याची त्यांनी मागणी केली. चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रामध्ये निकृष्ट दर्जाचा कोळसा वापरण्यात येत असल्यामुळे जास्त प्रदूषण होत असल्याचे त्यांनी सांगितले. कोळसा हा वॉशरी मध्ये धुऊन वापरण्याची त्यांनी मागणी केली व बंद असलेल्या कोळसा वॉशरीज विज प्रकल्पाद्वारे भाडे तत्वावर घेतल्या जाऊ शकतात असे सांगितले. विज प्रकल्पामध्ये पूर्ण क्षमतेएवढी विज निर्मीती होत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी, निरी या संस्थेच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या सादरीकरणामध्ये चंद्रपूर क्षेत्रात हवेचा वेग कमी असतो व त्यामुळे प्रदूषणाची परिणामता जास्त असल्याची बाबीची अतिरीक्त माहिती झाली असे सांगितले.

मा.आमदार, श्री.नानाजी शामकुळे यांनी बैठकीमध्ये चर्चिल्या जाणाऱ्या मुद्द्यांबाबतची टिप्पणी/माहिती लोकप्रतिनिधींना काही दिवस आधी देण्यात यावी जेणे करुन सदरील विषयाचा अभ्यास करणे शक्य होईल असे सांगितले. त्यांनी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राशी संबंधीत मुद्यांबाबत स्वतंत्र बैठक घेण्याची मागणी केली. कारखान्यांनी प्रदूषण नियंत्रणाबाबत, कोळसा वाहतुकीबाबत तसेच खाणींमुळे तयार होणाऱ्या अधिभार ढिगाऱ्यांबाबत केलेल्या उपाययोजनांबाबत नियमीतपणे आढावा घेतला जावा असे सांगितले. प्रदूषणास जबाबदार असलेल्या प्रत्येक मुद्याला स्वतंत्रपणे हाताळण्याची

गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. घुग्घुस येथे वे.को.ली. च्या वाहतुकीमुळे खुप प्रदूषण होत असल्याचे, तसेच घुग्घुस येथील तलावाचे उत्तर दिशेला खोलीकरण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सादरीकरणामध्ये जलप्रदुषणाचा उल्लेख नसल्याचे व चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे जुने चार संच बंद करण्याची मागणी केली. सांडपणी गोळा करण्याची पाईपलाईन संपूर्ण शहरात विकसित केली नसल्याचे, तसेच जेवढे काम झाले आहे ते सुध्दा सदोष असल्याचे सांगितले. ज्या रस्त्यांचे पाईपलाईन टाकण्यासाठी जवळपास एक वर्षाआधी खोदकाम केले त्यांच्या डांबरीकरणाचा प्रस्ताव नाही असे सांगून सांडपाणी प्रक्रिया संयंत्र नदीलगत बांधण्यास आक्षेप घेतला होता. परिसरातील सर्व कोळसा वॉशरीज बंद असल्याचे व चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरात कोळसा वॉशरी सुरु केली जाईल. परंतु त्यावर पुढील कार्यवाही झाली नसल्याचे सांगितले.

मा.आमदार, श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी, मागील बैठकीदरम्यान औद्योगिक सांडपाण्याचे नमुणे म.प्र.नि. मंडळाकडे तपासणीसाठी देण्यात आले होते त्याच्या अहवालासोबत शासकिय मानकांचा तक्ता नसल्याचे सांगितले. उद्योगामुळे व वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण सर्वाधिक असल्याने व बऱ्याचशा वाहनांमधून काळा धूर निघत असतो. या बाबीची परीवहन विभागाद्वारे तपासणी नियमीतपणे केली जावी असे सांगितले. इंधनामध्ये भेसळीमुळेपण प्रदूषण होत असल्याचे नमूद केले. कोळशाच्या ट्रकवर ताडपत्री झाकलेल्या असल्या तरीपण त्या फाटलेल्या असतात. वाहतुकीदरम्यान कसलेही नियम पाळले जात नाहीत व या गोष्टी तपासण्याची यंत्रणा कार्यान्वीत नसल्यामुळे प्रदूषण होत असल्याचा त्यांनी आरोप केला. वाहतुकींच्या वाहनांना विशेषता ट्रक्सना इंडीकेटर नसल्यामुळे रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने, यावर परिवहन विभागातर्फे कार्यवाही आवश्यक आहे. चंद्रपूर शहराजवळ पडोली येथे नारायण विद्यालयाला लागून असलेल्या कोळसा डेपोंमुळे खुप प्रदूषण होत असून सदरील कोळसा डेपो हटविण्याबाबत बऱ्याच वेळेस अर्ज देण्यात आल्याची त्यांनी माहिती दिली. अतिभार वाहतुकीमुळे (Overloading) रस्ते खराब होत असून कोळशाच्या अवैध साठवणुकीमुळे प्रदूषणात भर पडत असल्याने, कोळसा डेपो हे अवैधच असल्याने त्यांना बंद करण्यात यावे.

शासनातर्फे प्रदूषणास जबाबदार असणाऱ्या कारखान्यांवर कार्यवाहीच्या स्वरूपात फक्त बँक हमी जप्त केली जाते. प्रदूषण नियंत्रण व्यवस्था योग्य असल्याचा अहवाल दिला जातो परंतु त्याच कारखान्यामध्ये अपघात होतात असे त्यांनी सांगितले. वे.को.ली. च्या खाणींमध्ये ब्लास्टींगचे नियम पाळले जात नसल्याचा त्यांनी आरोप केला. तसेच बंद झालेल्या भुमीगत खाणींमध्ये रेती योग्य प्रमाणात भरली जात नसल्याचा सुध्दा त्यांनी मुद्दा उपस्थित केला. सादरीकरणामध्ये फक्त वर्धा नदीचा उल्लेख आहे परंतु वैनगंगा नदीचा उल्लेख नाही.

मा.आमदार, श्री.सुभाष धोटे यांनी, बल्लारपूर शहराचे पाणी वर्धा नदीमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे वर्धा नदी प्रदूषीत होत आहे. सदरील कारखान्याद्वारे वर्धा नदीमध्ये जॅकवेल बांधून पाण्याचा उपसा केला जातो व त्यामुळे नदी कोरडी झ ाली आहे असे त्यांनी सांगितले. मोठ्या उद्योगांद्वारे वायु प्रदूषण नियंत्रणासाठीची यंत्रणा (ESP) ही फक्त दिवसा चालवली जाते व रात्री बंद ठेवली जाते अशी त्यांनी तक्रार केली. कोळसा/सिमेंट वाहतुकीमुळे रस्त्यांवर धुळ साचलेली असते. वे.को.लि. च्या खाणींच्या अधिभार ढिगाऱ्यांमुळे नद्यांचे व नाल्याचे पात्र छोटे झाले आहे. असे सांगून याबाबत मा. मंत्री महोदयांनी कठोर भुमिका घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रदूषण कमी झाल्याशिवाय नविन उद्योगांना परवानगी न देण्याची त्यांनी मागणी केली. बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रॉडक्टस् लि. या कारखान्याने टाकलेला स्लज अजून स्थलांतरीत केल्या नसल्याचे त्यांनी नमूद केले. सदरील कारखान्यातून येणारा वास कमी झाला नसल्याचे व सांडपाण्याचा रंग सुध्दा बदलला नसल्याचे त्यांनी सांगितले. वाहनांनी विशेषत: ट्रक्सनी वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे वारंवार अपघात होत आहेत. यावर वाहतुक पोलीस व परिवहन विभागातर्फे कार्यवाही करण्याची त्यांनी मागणी केली. १०० कोटी वृक्ष लागवडीचे शासनाचे उद्दीष्ट होते परंतु याअंतर्गत जिल्हापरिषद व वन विभागाने पूर्णपणे कार्यवाही केली नसल्याचे व तसेच चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील जुने संच बंद करण्याची त्यांनी मागणी केली.

श्री. सुरेश चोपणे (अध्यक्ष, ग्रीन प्लॅनेट सोसायटी, चंद्रपूर) यांनी, CEPI अंतर्गत वायू प्रदूषणाची गुणसंख्या जास्त असल्याचे सांगून चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे जुने चार संच बंद करण्याची मागणी केली. वर्षातील सहा महीने वाऱ्याची दिशा चंद्रपूर शहराकडे राहते व उर्वरीत सहा महिने वाऱ्याची दिशा ही ताडोबा अभयारण्याच्या दिशेने असते. यामुळे वीज

प्रकल्पाच्या धुरांडयाची राख शहरामध्ये येत असल्याने, धुळीकणांचे उत्सर्जन विहीत मर्यादेपेक्षा खुप जास्त असल्याचे त्यांनी सांगितले. या राखेमध्ये मर्क्युरीचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे अशी त्यांनी माहिती दिली. राखमिश्रीत पाणी बाहेर सोडले जात असल्याचा त्यांनी आरोप केला व विज प्रकल्पातील जुनी यंत्रणा काढून नविन अद्ययावत प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याची त्यांनी मागणी केली व घरगुती वापरासाठी संशोधीत चुलीचा वापर केल्यास चोरीचा कोळसा वापरण्यासाठी प्रोत्साहन दिल्या सारखे होईल असे त्यांनी सांगितले. भुजलामध्ये नायट्रेटचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असल्याने त्यावर कार्यवाही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. मंगेश गुलवाडे (उपाध्यक्ष, भारतीय वैद्यक संघटना चंद्रपूर शाखा) यांनी, प्रदूषणाचा प्रभाव लोकांच्या आरोग्यावर होतो व यामुळे प्रदूषण कमी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. या अनुषंगाने चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लवकर सुरु व्हावे व या महाविद्यालयास सुपर स्पेशालीटी दर्जा देण्यात यावा अशी मागणी केली. चंद्रपूर शहरातील वाहतूकीची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने एक प्रस्ताव तयार करण्यात यावा.

श्री. बंडु धोतरे (अध्यक्ष, इको-प्रो संस्था) यांनी, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र मधील संच क्र. १ व २ हे संच सर्वाधिक जुने असल्यामुळे हे दोन संच बंद करण्याची त्यांनी मागणी केली. म.प्र.नि. मंडळाच्या अहवालामध्ये सुध्दा धूळीकणांचे प्रमाण जास्त असल्याचे नमूद आहे असे. विज प्रकल्पाच्या राखेमुळे शहरामध्ये दृश्यता राहत नसल्याचे सांगून त्यांनी प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण यंत्रणा कुचकामी असल्याचा आरोप केला. शहरातील वाहनांमध्ये सर्रासपणे भेसळयुक्त इंधन वापरले जाते तसेच वरोरा नाका येथे रस्त्यांचे काम सुरु असल्यामुळे धूळीचा अतोनात त्रास होतो असे त्यांनी सांगितले व महानगरपालीकेतर्फे रस्ते झाडल्यानंतर रस्त्यालगतची धुळ उचलण्यात येत नसल्याने अधिक धुळीचे प्रदूषण होत असल्याचे सांगितले.

श्री. मधुसूदन रुंगठा (अध्यक्ष, एमआयडीसी उद्योजक संघटना) यांनी, चंद्रपूर क्षेत्रात कोळसा/सिमेंट वाहतूक जास्त प्रमाणात असल्यामुळे तसेच विज प्रकल्पामुळे प्रदूषणात भर पडत असल्याचे सांगितले. एम.आय.डी.सी. ताडाली येथील तीन कारखाने बंद करण्यात आले. सदरील कारखानदार कारखाना सुरु करण्यास धजावत नाहीत कारण परत काही कारणास्तव बंद करावा लागल्यास त्यांना अतोनात नुकसान होईल असे त्यांनी सांगितले. कारखाने बंद राहील्यास रोजगार मिळणार नाहीत. तसेच कोट्यावधी रुपयांचे नुकसान होईल असे त्यांनी सांगितले. त्यांनी वाहनांमध्ये पेट्रोल/डीजेल ऐवजी LPG किंवा CNG चा वापर केल्यास प्रदूषण कमी होईल असे सांगितले. कोळसा वॉशरीज सुरु करण्याची त्यांनी मागणी केली व चंद्रपूर क्षेत्रातील एकूण परिस्थिती विचारात घेऊन अभ्यासाची दिशा ठरविली जावी तसेच वे.को.लि. तर्फे पर्यावरण संवर्धनाकरीता प्रती टन विशिष्ट कर घ्यावा अशी यांनी मागणी केली. बंद असलेले उद्योग पुन्हा सुरु केले जावेत असे त्यांनी सांगितले.

श्री. आर. के. मिश्रा (वे.को.लि. चंद्रपूर क्षेत्र) यांनी, ब्लॅक टॉपींग करण्यात आलेल्या रस्त्यांवर पाणी शिंपडल्यास रोड खराब होतात यामुळे कॉंक्रीटचे रस्ते तयार करण्याचे काम प्रस्तावित आहे असे सांगितले. तसेच अधिभार ढिगाऱ्यांबाबत पूर्वी सर्व नियम नव्हते व आता अंमलात असणाऱ्या सर्व नियमांनुसार दुरुस्ती करणे सुरु असल्याची व कोळसा वाहतुक नियमानुसार करण्याची सक्ती केली जाईल अशी माहिती दिली.

डॉ. दिपक म्हैसेकर (जिल्हाधिकारी, चंद्रपूर) यांनी, वे.को.लि. च्या खाणीच्या अधिभार ढिगाऱ्यामुळे नद्यांवर झालेला परीणामांबाबत पाहणी करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती व या समितीचा अहवाल आलेला असून सदरील अहवालामध्ये अधिभार ढिगाऱ्यांचा ईरई नदीमध्ये शिरकाव झाला असल्याचे निरीक्षण नोंदविले गेले आहे असे सांगितले. नदीलगत असणारे ढिगारे नदीकिनाऱ्यापासून ४५ मीटर दूर टाकण्यात यावेत तसेच अशा ढिगाऱ्यांचा नदीपात्रामध्ये शिरकाव होऊ नये याकरीता संरक्षणात्मक भिंती बांधण्यात याव्यात तसेच ढिगारे स्थिर झाल्यावर त्यावर वृक्षारोपण करण्यात यावे. नदीपात्रामध्ये शिरकाव झालेल्या अधिभार ढिगाऱ्यांचा उपसा करण्यासाठी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र व वे.को.लि. ने यंत्र सामुग्री पुरवावी. सांडपाणी गोळा करण्याची पाईपलाईन संपूर्ण शहरात विकसीत झालेली नाही.

श्री. पी. डी. गुंडावार (उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर) यांनी, वाहतुकीच्या मुद्यांबाबत पुढील ३ महीन्यात कृती आराखडा तयार करुन त्याप्रमाणे कार्यवाही केली आहेत असे सांगितले. परिवहन विभागातर्फे रात्री होणारे अपघात

टाळण्याच्या दृष्टीने ३ हजार मीटर लाल टेप खरेदी करुन जड वाहनांच्या मागील बाजूस लावण्याची मोहीम लवकरच सुरु करण्यात येईल व कोळसा वाहून नेणाऱ्या वाहनांवर योग्य प्रकारे ताडपत्रीचे आच्छादन तपासण्याबाबत कार्यवाही केली जाईल, तसेच त्यांनी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासोबत संयुक्तपणे इंधन भेसळीबाबत कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

श्री.पी.आर.बोखड (आयुक्त, चंद्रपूर महानगरपालीका) यांनी, नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा कार्यादेश झालेला असल्याची माहिती दिली व ही प्रक्रिया पूर्ण होण्यास ३ महीन्यांचा कालावधी लागेल. शहराचे दोन सांडपाणी प्रक्रिया संयंत्र नदीच्या काठावार स्थित असून ते नदीच्या पात्रामध्ये नाहीत असे सांगून त्यांनी दोन्हीपैकी एक संयंत्र डीसेंबर २०१३ च्या अखेरपर्यंत कार्यान्वित केले जाईल. पावसाचे पाणी शिरल्यामुळे यंत्रसामुग्री काही प्रमाणात नादुरुस्त झाली असल्याची त्यांनी माहिती दिली. रस्ते झाडल्यानंतर जमा झालेली धूळ एकत्र जमा करण्याची मोहीम राबविली जाते व ईरई व झरपट नदीच्या योग्य व्यवस्थापनासाठी पाहणी करुन अहवाल सादर करण्याचे काम नीरी या संस्थेला देण्यात आल्याची त्यांनी माहिती दिली.

श्री.राजू पी.बुरडे (मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र) यांनी, नीरी या संस्थेच्या सादरीकरणामध्ये कारखान्याशिवाय प्रदूषणास ईतरही स्त्रोत कारणीभूत आहेत असे स्पष्ट झाले आहे. तसेच संच १ व २ यांना असलेल्या ई.एस.पी. च्या आधुनिकीकरणाचा प्रस्ताव असल्याची माहिती दिली.

श्री.आर.ए.राजीव (प्रधान सचिव, पर्यावरण) यांनी, अधिभार ढिगाऱ्यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन केले जावे अशी अट पर्यावरण व वने मंत्रालयातर्फे देण्यात आलेल्या पर्यावरणीय परवान्यामध्ये अंतर्भूत असल्याचे सांगितले. वे.को.लि. चे अधिभार ढीगारे नदीमध्ये जात असल्याचे निरीक्षणास आले आहे असे सांगून या ढिगाऱ्यांचा उतार योग्य प्रकारे राखण्याबाबत त्यांनी सूचित केले. वे.को.लि. च्या सर्व खाणींच्या नदीलगत असणाऱ्या ढिगाऱ्यांच्या योग्य व्यवस्थापनाबाबत निरी द्वारे अभ्यास करुन कृती आराखडा एका महिन्यात सादर करण्याबाबत त्यांनी वे.को.लि. च्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले. वे.को.लि. ने योजनाबध्द कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाशी मिळून कार्यवाही करावी. मुळ कृती आराखडा नीरी च्या वैज्ञानिकांना अभ्यासण्यासाठी द्यावा तसेच त्याचा समावेश अहवालामध्ये करण्यास सूचित केले. कोळसा वाहतुकीचे कंत्राट देताना त्यामध्येच बंदीस्त वाहनांमधून वाहतुक करण्याची अट टाकण्याच्या सुचना वे.को.लि. च्या अधिकाऱ्यांना केल्या. तसेच या सर्व प्रक्रियेसाठी किती कालावधी लागेल ते स्पष्ट करण्याचे सुचना केली. नागरी घनकचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास असेंद्रीय घनकचऱ्या पासून विटा तयार करुन कारखानदारांना त्या विकल्या जाऊ शकतात व याद्वारे महानगरपालीकेस आर्थिक लाभ होऊ शकतो असे सांगितले. तसेच कारखानदार व महानगरपालीका संयुक्तपणे हरीतपट्टा निर्माण करु शकतात व यासाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर होऊ शकतो असे सांगितले. त्यांनी, शहराच्या प्रवेश करण्यासाठीच्या रस्त्याजवळ व शहरातून बाहेर निघणाऱ्या रस्त्याजवळ जडवाहनांसाठी पार्किंग ची व्यवस्था करावी असे सुचविले. तसेच रींग रोड चा पर्याय तपासून पाहावा. चंद्रपूर कृती आराखड्यातील सर्व मुद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे असे सांगून बैठकीमध्ये चर्चिल्या गेलेल्या मुद्द्यांवर सुध्दा संबंधित विभागांनी कार्यवाही करावी असे सांगितले. फक्त उद्योगांवरच कार्यवाही करुन प्रदूषणाच्या समस्येचे निराकरण होणार नसल्याचे सांगून सर्व मुद्द्यांवर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल केंद्र शासनास पाठविण्यात येईल व त्यावर केंद्र शासन उद्योगांवरील बंदीबाबत पुढील निर्णय घेईल असे सांगितले व कृती अहवाल सर्व लोकप्रतिनीधींना कळविण्यात येईल.

मा.पर्यावरण मंत्री श्री.संजय देवतळे यांनी आय.आय.टी., मुंबई व निरी या संस्थांद्वारे शास्त्रीय पध्दतीने अभ्यास केला जात असल्याचे सांगितले व मुळ स्त्रोत शोधून कार्यवाही करता येईल तसेच या अभ्यासामध्ये अशासकिय संस्था व इतर घटकांची पण मदत घेतली जाऊ शकते. नदीलगत असणाऱ्या नवीन खाणींना व सध्या अस्तित्वात असलेल्या खाणींच्या प्रमाणपत्रांच्या नुतनीकरणाला परवानगी थांबविली आहे अशी माहिती दिली व शासनातर्फे सुचविलेल्या उपयायोजना अंमलात आणल्यानंतरच यांना परवानगी दिली जाईल. प्रत्येक बैठकीमध्ये चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या प्रदुषणाचा मुद्दा मांडला जातो व सन २०१० मधील अहवाल पाहण्यापेक्षा अलीकडचा अहवालामध्ये किती प्रमाण आहे हे तपासून पाहून त्यावर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्ययावत करण्याबाबत कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले. धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत प्रयत्नशील असल्याचे सांगून उद्योगांवरील बंदी उठविण्याचा प्रयत्न सुरु आहे.

सरतेशेवटी मा.मंत्री, पर्यावरण यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात घोषणा करतांना, निरी व आयआयटी यांनी त्यांचा प्राथमिक अहवाल जानेवारी, २०१४ पर्यंत सादर करावा, जेणेकरुन आवश्यक ती पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक संपविण्यात आली.

-------

## परिशिष्ठ-१
## कार्यवाही करण्याबाबतची ठळक मुद्दे

| अ.क्र. | मुद्दे | कोणत्या विभागाकडून कार्यवाही अपेक्षित |
|---|---|---|
| १ | **वे.को.लि.च्या कोळसा खाणी** | |
| | १ कोळसा खाणीतील मातीचे ढीगारे नदीच्या पात्रात जाऊन, नदीचे पात्र बाधित होणे. | संयुक्त कार्यवाही-डी.जी.एम.एस., वे.को.लि., जिल्हाधिकारी, म.प्र.नि.मंडळ, पाटबंधारे विभाग. |
| | २ मातीच्या ढीगाऱ्याचा उतार हा ४५ अंशावर असावा, त्यावर चेनचे पायदान व झाडे लावण्यात यावी. | वे.को.लि., वन व पर्यावरण मंत्रालय, भोपाळ, म.प्र.नि.मंडळ. |
| | ३ कोळसा वाहतूक करतांना वाहतूक बंदिस्त ट्रकव्दारे करण्यात यावी, | वे.को.लि., |
| | ४ कोळसा वाहतूक करतांना रस्त्ये खराब होणे व ते दुरुस्त करणे, | वे.को.लि., परिवहन विभाग, म.प्र.नि.मंडळ. |
| | ५ वे.को.लि.क्षेत्रातील प्रदूषण व वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण, | वे.को.लि., वन व पर्यावरण मंत्रालय, भोपाळ, म.प्र.नि.मंडळ. |
| २ | **चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र** | |
| | १ संच क्र.१, २, ३ व ४ मधील नुतनीकरण करण्याचे प्रस्ताव | महाजेनको, म.प्र.नि.मंडळ |
| | २ सद्यस्थितीत सुरु असलेले सातही संचाचे धुळीकणांचे प्रमाण संमतीपत्रात नमूद केलेल्या अटीप्रमाणे ठेवणे | महाजेनको, म.प्र.नि.मंडळ |
| | ३ महाऔष्णिक केंद्रातर्फे कमी प्रमाणाची राख असलेला कोळशात वापरणे | महाजेनको, वेकोलि, म.प्र.नि.मंडळ |
| | ४ महाऔष्णिक केंद्रातर्फे स्वत:ची कोलवॉशरी कार्यान्वित करणे | महाजेनको |
| ३ | **बल्लारपूर पेपर मिल, बल्लारपूर** | |
| | १ नदीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याचे प्रमाण कमी करणे | बल्लारपूर पेपर मिल, |
| | २ नदीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याचे रंग नाहीसे करणे | बल्लारपूर पेपर मिल व म.प्र.नि.मंडळ |

| | | |
|---|---|---|
| | ३ चुनखडी जास्तीतजास्त सिमेंट कारखान्यांना वापरणे | बल्लारपूर पेपर मिल व सिमेंट उद्योग |
| | ४ पेपर मिलचे प्रदूषण संमतीपत्रातील अटीप्रमाणे विहित मर्यादेत ठेवणे, | बल्लारपूर पेपर मिल व म.प्र.नि.मंडळ |
| | ५ सांडपाण्याचा वापर शेती व बागायतीसाठी वापरणे | बल्लारपूर पेपर मिल |
| ४ | **ताडाळी येथील स्पाँज आयर्न उद्योग व घुग्घुस येथील उद्योग**<br>१ स्पाँज आयर्न उद्योग व इतर उद्योगांनी संमतीपत्रातील अटींप्रमाणे प्रदूषणाचे प्रमाण विहित मर्यादेत ठेवणे | स्पाँज आयर्न व घुग्घुस येथील उद्योग व म.प्र.नि.मंडळ |
| | २ स्पाँज आयर्न उद्योगातील उत्पादित होणारा डोलोचार साठविण्याकरीता जागा उपलब्ध करणे | स्पाँज आयर्न उद्योग व म.औ.वि.महामंडळ |
| ५ | **चंद्रपूर महानगरपालिका**<br>१ दोन्ही सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणना कार्यन्वित करणे | महानगरपालिका व जिल्हाधिकारी |
| | २ घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित करणे | महानगरपालिका व जिल्हाधिकारी |
| ६ | **बल्लारपूर नगर परिषद**<br>१ सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेचे प्रस्ताव तयार करणे | नगर परिषद व जिल्हाधिकारी |
| | २ घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे प्रस्ताव तयार करणे | नगर परिषद व जिल्हाधिकारी |
| ७ | **इतर मुद्दे**<br>१ चंद्रपूर व बल्लारपूर शहरात लगतचे कोल डेपो स्थलांतरित करणे | जिल्हाधिकारी |
| | २ घरगुती इंधनाकरीता कोळशाचा वापर न करणे | वे.को.लि. व जिल्हाधिकारी |
| | ३ प्रदुषणामुळे आरोग्यावर परिणाम | वे.को.लि., जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ८ | **निरी व आयआयटी, मुंबई**<br>१ अभ्यासक्रमाचा प्राथमिक अहवाल ३ महिन्यांत सादर करणे | निरी व आयआयटी, मुंबई |

## परिशिष्ठ-ब

### बैठकीस उपस्थित लोकप्रतिनीधी व शासकिय अधिकारी यांची यादी

१. मा. खासदार श्री. हंसराज अहीर, चंद्रपूर-वणी क्षेत्र.
२. मा. आमदार श्री. नानाजी शामकुळे, चंद्रपूर विधानसभा क्षेत्र.
३. मा. आमदार श्री. सुभाष धोटे, राजुरा विधानसभा क्षेत्र.
४. मा. आमदार श्रीमती शोभाताई फडणवीस, मुल-सावली विधानसभा क्षेत्र.
५. डॉ. दिपक म्हैसेकर, जिल्हाधिकारी, चंद्रपूर
६. श्री. वि. मो. मोटघरे, सह-संचालक (हवा प्रदूषण नियंत्रण), म.प्र.नि. मंडळ, मुंबई
७. श्री. डी. बी. पाटील, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर
८. श्री. सं. दे. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर
९. श्री. संजय पी. ठाकरे, मुख्य वन संरक्षक, चंद्रपूर
१०. श्री. पी. आर. बोखड, आयुक्त, महानगरपालिका, चंद्रपूर
११. श्री. पी. डी. गुंडावार, उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर
१२. श्री. राकेश कुमार, मुख्य शास्त्रज्ञ, निरी, मुंबई.
१३. डॉ. श्री. राजेश बिनीवाले, मुख्य शास्त्रज्ञ, निरी, नागपूर.
१४. श्री. आशुतोष सलिल, उप जिल्हाधिकारी, चंद्रपूर
१५. श्री. डी. एन. शेळके, कार्यकारी अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर
१६. श्रीमती संपदा मेहता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
१७. श्री. राजीव जैन, पोलिस निरीक्षक, चंद्रपूर
१८. श्री. बंडू एस. धोत्रे, अध्यक्ष, इको-प्रो संस्था, चंद्रपूर
१९. डॉ. मंगेश गुलवाडे, उपाध्यक्ष, भारतीय वैद्यक संघटना, चंद्रपूर शाखा
२०. प्रा. श्री. सुरेश चोपणे, अध्यक्ष, ग्रिन प्लॅनेट सोसायटी, चंद्रपूर
२१. श्री. मधुसुदन रुंगठा, अध्यक्ष, औद्योगिक वसाहत संघटना, चंद्रपूर
२२. डॉ. टी. जी. धोटे, जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर
२३. श्री. विजय बी. जगतारे, अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, चंद्रपूर
२४. श्री. राजू पी. बुरडे, मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर
२५. श्री. एस. एन. मोरे, अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ.
२६. श्री. एस. वाय. वाघ, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण, चंद्रपूर.
२७. डॉ. एस. पी. आवळे, जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर
२८. डॉ. स्वप्नील टेंभ्रे, आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
२९. श्री. अनिल घुमडे, मुख्य अभियंता, महानगरपालिका, चंद्रपूर
३०. श्री. आर. रॉय, वणी उत्तर क्षेत्र, वे.को.लि.
३१. श्री. के. कुमार, वणी उत्तर क्षेत्र, वे.को.लि.
३२. डॉ. डी. एल. जाधव, जिल्हा कृषी अधिकारी, चंद्रपूर
३३. श्री. एच. एन. वनकर, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र
३४. श्री. डी. के. गुप्ता, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र
३५. श्री. एस. एम. तेलंग, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर.
३६. श्री. नितीन सेन, वे.को.लि., वणी उत्तर क्षेत्र
३७. आर. डी. चिवाणे, पर्यावरण विभाग, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर
३८. श्री. रवी गिते, जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
३९. श्री. आर. के. मिश्रा, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र
४०. श्री. एस. एस. माझी, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र